<u>नियमीत दिवाणी दावा क्र ३१०/९३ नि. ९२ वरील आदेश</u>

१. सदरचा अर्ज आदेश ६ नियम १७ दिवाणी प्रक्रिया संहिता अन्वये दावा दुरुस्तीसाठी दाखल करण्यात आला. अर्जात वादीचे म्हणणे आहे की प्रतिवादींनी त्यांचे कैफियत कलम ५ मध्ये दावा मिळकतीत आणेवारीने नोंद दिसून येत आहे म्हणून कायद्याने वाटपाचे कामी इतर सर्व हिस्सेदारांना दाव्यात सामील करणे जरुरीचे आहे अशी तक्रार केली आहे त्यामुळे वादीचे वडीलांचे इतर भाऊ–बहीणींना दाव्यात दुरुस्ती करुन सामील करणे भाग पडले आहे. सदरची दुरुस्ती किरकोळ स्वरुपाची आहे, त्यामुळे दाव्यात प्रतिवादी क्र. ७ नंतर प्रतिवादी क्र. ८ ते ११ प्रमाणे इतर प्रतिवादी समाविष्ट करणेसाठी दावा दुरुस्तीची मागणी करण्यात आली.

२. सदर अर्जास प्रतिवादीतर्फे विरोध दर्शविण्यात आला की, निशाणी ८६ नुसार वादीने मोठमोठया दुरुस्त्या केल्या आहेत, प्रतिवादीची कैफीयत दिनांक ०२/०२/९४ ची आहे, त्यानंतर वादमुद्दे निघाले आहेत, दाव्याचे कामकाज लांबविण्यासाठी सदरचा अर्ज दाखल करण्यात आला आहे म्हणून रद्द करण्यात यावा.

३. दोन्ही बाजूंना ऐकून घेण्यात आले. वादीतर्फे सदरचे अर्जाचे पुष्ठयर्थ <u>पुरण राम वि. भागुराम महा.लॉ.ज. २००८(४) – १ स.न्या.</u> या न्यायनिवाडयावर भिस्त ठेवण्यात आली, ज्यामध्ये नमुद आहे की....

> "It is well settled by the catena of decisions of this Court that allowing and rejecting an application for amendment of a plaint is really the discretion of the Court and amendment of the plaint also should not be refused on technical grounds".

मी सदरचा न्यायनिवाडा काळजीपूर्वकपणे वाचला.

४. सदरचा दावा हा वाटप होवून कब्जा मिळणेसाठी दाखल करण्यात

आलेला आहे. प्रतिवादींनी त्यांचे कैफियत उतारा ५ मध्ये इतर सहहिस्सेदारांना समाविष्ट केलेले नाही या बाबत तक्रार केली आहे. त्या तक्रारीचे निराकरण करणेसंबंधी वादीतर्फे इतर सहहिस्सेदारांना दाव्यात समाविष्ट करण्यात यावे म्हणून विनंती केलेली आहे. सदरची दावा दुरुस्ती जर वाचली तर ती किरकोळ स्वरुपाची असल्याचे आढळून येते. दावा वाटपासंबंधी असल्याने व दाव्याचा योग्य निर्णय होणे गरजेचे असल्याने इतर सहहिस्सेदारांना समाविष्ट करणेची संधी वादीला देणे न्यायोचित वाटते. तसे केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होत नाही. हे खरे आहे की, सदर अर्ज दाखल करण्यास वादीतर्फे उशीर झालेला आहे. त्याबाबत मुळ प्रतिवादी क्र. १ ते ७ यांना वादीकडून परिवेय रक्कम मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब अर्ज मंजूर होणे न्यायोचित आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश.

## आदेश

१. अर्ज निशाणी ९२ मंजूर करण्यात आला.

२. वादीने प्रतिवादी क्र. १ ते ७ यांना प्रत्येकी रु.२००/— (रुपये दोनशे) परिवेय रक्कम दिल्यास दावा दुरुस्ती करणेस परवानगी देण्यात येते.

३. दावा दुरुस्ती मुदतीचे आत करण्यात यावी.

कराड
दिनांक ०१/१०/२००९

(अ.दि.जवळकार)
तिसरे सहदिवाणी न्यायाधिश कराड